सत्यमेव जयते

अनुसूचित जाती कल्याण समिती

अनुसूचित जाती कल्याण समितीच्या कार्यपद्धतीचे नियम

(अंतर्गत कामकाजासंबंधी)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

अनुसूचित जाती कल्याण समिती

अनुसूचित जाती कल्याण समितीच्या कार्यपद्धतीचे नियम
(अंतर्गत कामकाजासंबंधी)

एचबी २४०६—१

प्रस्तावना

महाराष्ट्र विधानमंडळाने दिनांक ६ मे १९७१ रोजी महाराष्ट्र विधानसभा आणि महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम २३३/२१० अन्वये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती कल्याण समिती घटित केली होती. तद्नंतर विमुक्त जाती, भटक्या जमातींना देखील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या कक्षेत आणण्याच्या दृष्टीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती दिनांक ५ सप्टेंबर १९७३ रोजी पुनर्घटित करण्यात आली. सन १९७९ पर्यंत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती अशी एकच संयुक्त समिती होती. परंतु अनुसूचित जमातीच्या लोकांच्या विकासासाठी तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्यासाठी स्वतंत्र समितीची आवश्यकता भासल्यामुळे त्यांच्यासाठी अनुक्रमे दिनांक ११ ऑगस्ट १९७९ रोजी तसेच दिनांक २३ जुलै १९८१ रोजी अनुक्रमे अनुसूचित जमाती कल्याण समिती तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती अशा दोन वेगवेगळ्या स्वतंत्र समित्या घटीत केल्या गेल्या व महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषदेच्या नियमांत त्यानुसार योग्य तो बदल करून दिनांक २३ जुलै १९८१ रोजी अनुसूचित जातीच्या लोकांच्या कल्याणासाठी "अनुसूचित जाती कल्याण समिती" या नावाने एक स्वतंत्र समिती घटीत करण्यात आली.

विधानमंडळाच्या पूर्वीच्या एकत्रित असलेल्या समितीने आपल्याअंतर्गत कामकाजाच्या कार्यपद्धतीचे नियमन करण्यासाठी जे नियम तयार करून स्वीकारले होते त्यानुसारच आतापर्यंत समितीचे अंतर्गत कामकाज करण्यात येत होते. महाराष्ट्र विधानसभा नियम (१९०) अन्वये समितीच्या अंतर्गत कामकाजाबाबतचे नियम करणे आवश्यक असल्याने मा. अध्यक्षांनी मान्यता दिल्यानंतर पूर्वी तयार करण्यात आलेल्या नियमांच्या धर्तीवर त्यात आवश्यक ते बदल करून तसेच त्यामध्ये काही नवीन मुद्दे समाविष्ट करून अनुसूचित जाती कल्याण समितीचे अंतर्गत कामकाजासाठी हे नियम तयार करण्यात आले व समितीच्या दिनांक २३ जून १९९५ रोजीच्या बैठकीत विचार विनिमय करून ते मान्य करण्यात आले.

दिनांक ८ मे १९८१ रोजी पासून अनुसूचित जाती कल्याण समिती वेगळी घटित झाली असल्याने व या समितीचे अंतर्गत कामकाजाविषयक नियम पुन्हा तयार करण्याची आवश्यकता भासल्याने हे नियम करून ते प्रथम सन १९९५ मध्ये पुस्तिकेमध्ये समाविष्ट करून प्रसिद्ध करण्यात आले.

अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अंतर्गत कामकाजासंबंधीच्या कार्यपद्धतीच्या नियमांची पहिली आवृत्ती सन १९९५ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर नियमात कोणताही बदल समाविष्ट करण्यात आलेला नसून समितीच्या अंतर्गत कामकाजासंबंधीच्या नियमांची दुसरी आवृत्ती याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक नोव्हेंबर, २००९.

अनुक्रमणिका

			पृष्ठे
(१)	अनुसूचित जाती कल्याण समितीची रचना व कार्य	..	१
(२)	अनुसूचित जाती कल्याण समिती कार्यपद्धतीचे नियम (अंतर्गत कामकाज)	..	३
(३)	जोडपत्र	..	९
(४)	दिनांक ३० एप्रिल १९७१ रोजी विधानसभेने संमत केलेला प्रस्ताव.	..	१३
(५)	दिनांक ४ मे १९७१ रोजी विधानपरिषदेने संमत केलेला प्रस्ताव.	..	१५

अनुसूचित जाती कल्याण समितीची रचना व कार्य

दिनांक ३० एप्रिल, १९७१ रोजी विधानसभेने व दिनांक ४ मे १९७१ रोजी विधानपरिषदेने संमत केलेल्या प्रस्तावानुसार (परिशिष्ट-अ) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती कल्याण समिती प्रथम गठीत करण्यात आली. दिनांक ६ मे १९७१ रोजी प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या निवडणुकीच्या पद्धतीनुसार एकल संक्रमणीय मतदानाने झालेल्या निवडणुकीत विधानसभेतील ११ सदस्य व विधानपरिषदेतील ४ सदस्य या समितीवर निवडून आले होते, त्यानंतर ११ ऑगस्ट १९७९ रोजी उक्त समितीचे विभाजन होऊन अनुसूचित जमातीच्या लोकांच्या कल्याणासंदर्भात तपासणी करण्यासाठी स्वतंत्रपणे अनुसूचित जमाती कल्याण समिती ही दुसरी समिती दिनांक ११ ऑगस्ट १९७९ रोजी गठीत करण्यात आली. त्यानंतर दिनांक २३ जुलै १९८१ रोजी विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांच्या कल्याणासाठी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती अशी तिसरी समिती गठीत करण्यात आली. अशाप्रकारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या वेगवेगळया ३ समित्या आता गठीत करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती कल्याण समिती ही स्वतंत्रपणे पहिल्यांदा दिनांक ८ मे १९८१ रोजी गठीत करण्यात आली आहे. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम क्रमांक २३३ व २३४ मध्ये समितीची रचना व कामे यासंबंधी खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे :—

२३३. (१) दरवर्षी विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा यथास्थिती नव्याने रचना केलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर शक्यतितक्या लवकर अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी समिती स्थापन करण्यात येईल. या समितीमध्ये जास्तीत जास्त १५ सदस्यांचा समावेश असेल. त्यापैकी विधानसभेच्या सदस्यांमधून अध्यक्ष जास्तीत जास्त ११ सदस्य नामनिर्देशित करतील आणि त्याच रीतीने सभापती विधानपरिषदेच्या सदस्यांमधून जास्तीत जास्त ४ सदस्य नामनिर्देशित करतील, अशा प्रकारे एकूण १५ सदस्यांची ही समिती असेल.

(२) या समितीचे सदस्य नवीन समितीची रचना करण्यात येइपर्यंत पद धारण करतील.

म.वि.स.नियमातील नियम क्र. २३४ नुसार अनुसूचित जाती कल्याण समितीची कामे खालीप्रमाणे आहेत :—

(एक) संविधानाच्या अनुच्छेद ३३८ (२) अन्वये *आयुक्त, अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांनी सादर केलेल्या अहवालावर जेथवर महाराष्ट्र राज्यातील

अनुसूचित जातीशी त्यांचा संबंध येत असेल तेथवर, विचार करणे आणि राज्य शासनाच्या कक्षेत येणा-या बाबीसंबंधात राज्य शासनाने काय उपाययोजना करावी, याविषयीची माहिती दोन्ही सभागृहांस सादर करणे ;

(दोन) समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी दोन्ही सभागृहांना माहिती देणे ;

(तीन) अनुच्छेद ३३५ (४) मधील तरतुदी विचारात घेऊन राज्य शासनाने आपल्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये व पदांवर (यात सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांतील, सांविधिक व निमसरकारी संस्थांमधील नियुक्त्यांचाही समावेश आहे) अनुसूचित जातीच्या उमेदवारांना योग्य प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे ;

(चार) राज्य शासनाच्या कक्षेत येणा-या अनुसूचित जातीच्या कल्याणासंबंधातील सर्व बाबींचा सर्वसाधारणतः विचार करणे व दोन्ही सभागृहांना त्याबाबतचा अहवाल देणे ;

(पाच) सभागृहाने अथवा अध्यक्षांनी समितीकडे विनिर्देशपूर्वक निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे.

अनुसूचित जाती कल्याण समिती

कार्यपद्धतीचे नियम

(अंतर्गत कामकाज)

(दिनांक २३ जून १९९५ रोजी झालेल्या बैठकीत समितीने संविहित केल्याप्रमाणे आणि महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १८९ अन्वये मा. अध्यक्षांनी अनुमोदन दिल्याप्रमाणे)

अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अंतर्गत कामकाजासंबंधाचे नियम

महाराष्ट्र विधानसभा नियमावलीत नियम २३३ व २३४ मधील तरतुदी अनुसूचित जाती कल्याण समितीच्या घटनेसंबंधी व तिच्या कामकाजाच्या व्याप्तीसंबंधी असून त्या तरतुदींना खालील नियम पूरक आहेत :—

१. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ.—(अ) या नियमांना अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अंतर्गत कामकाजासंबंधीचे नियम असे म्हणावे.

(ब) ते ताबडतोब अंमलात येतील.

२. समितीच्या बैठका.—समिती प्रमुख ठरवतील त्या दिवशी समितीच्या बैठका होतील; परंतु असे की, समिती प्रमुखांनी अन्यथा निदेश दिल्याखेरीज, रविवारी आणि इतर सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी बैठका होणार नाहीत. आणखी असे की, समिती प्रमुख सहज उपलब्ध नसल्यास, बैठकीची तारीख व वेळ सचिवांना निश्चित करता येईल.

३. समितीच्या बैठकींची सूचना.-समितीच्या बैठकीची तारीख व वेळ समिती प्रमुखांनी निश्चित केल्यानंतर समितीच्या सदस्यांना तशी सूचना देण्यात येईल.

४. समितीला सादर करावयाचे साहित्य.—(१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव किंवा इतर कोणीही अधिकारी समाजकल्याण विभागाला माहिती पुरविण्याची विनंती करील.

(२) समाजकल्याण विभाग अशा साहित्याच्या ५० प्रती १५ दिवसांत समितीच्या उपयोगासाठी विधानमंडळ सचिवालयाला सादर करील.

५. साहित्य समितीच्या सदस्यांना परिसृत करणे.—हे साहित्य महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे आल्यानंतर शक्य तितक्या लवकर ते स्पष्टीकरणात्मक संक्षिप्त ज्ञापनासह समितीच्या सदस्यांना परिसृत करण्यात येईल.

६. समितीकडे परिसृत केलेली कागदपत्रे गोपनीय समजणे.—समितीकडे परिसृत केलेली कागदपत्रे गोपनीय समजण्यात येतील व त्यातील मजकूर दुस-या कोणासही कळविण्यात

(शा.म.मु.) एचबी २४०६—२ (१०५—२-२०२०)

येणार नाही किंवा त्याचा उल्लेख समितीच्या बाहेर कोणत्याही वेळी करण्यात येणार नाही. सभागृहासमोर ठेवलेल्या कागदपत्रात किंवा अभिलेखात असलेल्या माहितीचाच फक्त उल्लेख करता येईल.

७. समितीच्या सदस्यांनी विचारावयाचे प्रश्न.–(१) कागदपत्रे वाचल्यानंतर समितीच्या सदस्यांना ज्या प्रश्नांविषयी किंवा मुद्यांविषयी अधिक माहिती पाहिजे असेल ते प्रश्न किंवा मुद्दे ते तयार करतील.

(२) समिती प्रमुखांनी निश्चित केलेल्या तारखेला हे प्रश्न किंवा मुद्दे समितीच्या सदस्यांकडून महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविण्यात येतील.

८. अभ्यासगटांची आणि / किंवा उप समित्यांची नियुक्ती.–(१) निरनिराळया विषयांचा तपशिलवार अभ्यास व तपासणी करण्यासाठी समिती एक किंवा अधिक अभ्यासगट आणि/ किंवा उप समित्या वेळोवेळी नियुक्त करील.

(२) अभ्यासगटाची आणि/किंवा उप समितीची कामे, इतर गोष्टींबरोबर खालीलप्रमाणे राहतील :—

(एक) समाजकल्याण विभागाकडून मिळालेल्या किंवा संबंधित मंत्रालयीन विभागाने पुरविलेल्या साहित्याचा सखोल अभ्यास करणे.

(दोन) समिती प्रमुखाने मान्यता दिल्यानंतर समाजकल्याण किंवा संबंधित विभागाला पाठवावयाची प्रश्नावली तयार करणे व त्याबाबतची माहिती समाजकल्याण विभागामार्फत प्राप्त करून घेणे.

(तीन) समाजकल्याण किंवा इतर संबंधित विभागाकडून आलेल्या उत्तरांची तपासणी करणे व ती विचारात घेणे.

(चार) समितीने किंवा समिती प्रमुखाने पाठविलेल्या कोणत्याही प्रकरणाचा अभ्यास करणे व त्याबाबतचा अहवाल सभागृहाला सादर करणे.

(पाच) अभ्यास दौरे काढणे व त्यावरील अभ्यास टिप्पण्या तयार करणे.

(सहा) ज्यांच्या आधारावर अहवालाचा मसुदा तयार करता येईल असे ठळक मुद्दे काढणे.

(सात) अहवालाचा मसुदा संपूर्ण समितीला परिसृत करण्यापूर्वी त्यावर चर्चा करणे.

(आठ) अगोदरच्या अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या शिफारशींच्या बाबतीत समाजकल्याण किंवा संबंधित विभागाकडून आलेल्या उत्तरांची छाननी करणे.

(नऊ) अगोदरच्या अहवालांमध्ये समाविष्ट असलेल्या शिफारशींच्या बाबतीत त्यांच्या आधारांवर अहवालांचा मसुदा तयार करता येईल असे मुद्दे काढणे.

(दहा) अगोदरच्या अहवालात समाविष्ट असलेल्या शिफारशींच्या बाबतीत अहवालाचा मसुदा संपूर्ण समितीला परिसृत करण्यापूर्वी त्यावर चर्चा करणे.

९. समाजकल्याण किंवा संबंधित विभागाकडे पाठवावयाची पूरक प्रश्नावली.–(१) विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन केल्यानंतर समितीच्या सदस्यांना ज्या प्रश्नांविषयी किंवा मुद्यांविषयी अधिक माहिती पाहिजे असेल ते प्रश्न किंवा मुद्दे ते तयार करतील.

(२) समिती प्रमुखांनी निश्चित करावयाच्या तारखेला हे प्रश्न किंवा मुद्दे समितीच्या सदस्यांकडून महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविण्यात येतील.

(३) परीक्षणाधीन विषयासंबंधीच्या इतर सुसंगत मुद्यांसह समितीच्या सदस्यांनी सुचविलेले प्रश्न किंवा मुद्दे पूरक प्रश्नावलीच्या स्वरुपात एकत्रित करण्यात येतील.

(४) अभ्यासगट आणि/किंवा उप समिती पूरक प्रश्नावलीचा विचार करील. समिती प्रमुखांनी त्यास मान्यता दिल्यानंतर ती समाजकल्याण किंवा संबंधित विभागाकडे पाठविण्यात येईल आणि तो विभाग समिती प्रमुखांनी निश्चित केलेल्या तारखेला त्या प्रश्नावलीच्या उत्तरांचे ५० संच समाजकल्याण विभागामार्फत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे सादर करील.

(५) समिती प्रमुखांनी मान्यता दिलेल्या पूरक प्रश्नावलीच्या प्रती समितीच्या सदस्यांना परिसृत करण्यात येतील.

(६) समाजकल्याण किंवा संबंधित विभागाकडून प्रश्नावलीची आलेली उत्तरे या नियमांतील नियम ८ मधील विहित केलेल्या पद्धतीनुसार समितीच्या सदस्याना परिसृत करण्यात येतील.

१०. तोंडी तपासणीसाठी मुद्दे.–(१) समिती प्रमुखांच्या मान्यतेसाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय साक्षीदाराच्या तोंडी तपासणीबाबतच्या मुद्यांची आणि/किंवा प्रश्नांची एक यादी तयार करून समितीच्या सदस्यांकडून त्याबाबतीत आलेल्या कोणत्याही सूचना त्यात समाविष्ट करील.

(२) मुद्यांच्या किंवा प्रश्नांच्या अशा यादींच्या प्रती समितीच्या सभासदांना आगाऊ परिसृत करण्यात येतील.

११. समितीच्या बैठकीचा कार्यक्रम परिसृत करणे.–सचिव, समिती प्रमुखांच्या संमतीने समितीच्या बैठकीचा सविस्तर कार्यक्रम तयार करतील आणि त्याच्या प्रती समितीच्या सदस्यांना तसेच समाजकल्याण विभागाच्या सचिवांना, संबंधित शासकीय विभागाच्या

सचिवांना आणि संबंधित क्षेत्रीय विभागप्रमुखांना परिसृत करतील म्हणजे समितीपुढे साक्ष देण्यासाठी ते सर्व तयारीनिशी सिद्ध राहतील.

१२. सचिव, समाजकल्याण विभाग आणि संबंधित शासकीय विभागांच्या सचिवांना बोलावणे.—समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी, समितीला जेव्हा जेव्हा मदत लागेल तेव्हा तेव्हा सचिव, समाजकल्याण विभाग, सचिव, सामान्य प्रशासन (मागासवर्गीय कक्ष) विभाग आणि (आवश्यक वाटल्यास इतर अधिका-यांसहित) संबंधित शासकीय विभागांच्या सचिवांना बोलविण्यात येईल.

१३. तोंडी साक्ष घेण्याची कार्यपद्धती.—(१) प्रथम समिती प्रमुख साक्षीदाराला एखादा प्रश्न विचारतील आणि त्यानंतर त्याला प्रश्न विचारण्यासाठी इच्छा असल्यास समिती प्रमुखांच्या परवानगीने ते प्रश्न विचारु शकतील. कोणताही मुद्दा ताबडतोब स्पष्ट करून सांगण्यासारखी साक्षीदारांची तयारी नसल्यास ; त्यानंतर शक्य तितक्या लवकर महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे लेखी उत्तर सादर करण्याची परवानगी समिती प्रमुखांकडून त्याला मिळू शकेल.

(२) कार्यवाहीचे संबंधित भाग, दुरुस्तीसाठी समितीच्या सदस्यांकडे आणि समितीसमोर साक्ष देणा-या साक्षीदारांकडे पाठविण्यात येतील व ते मिळाल्यानंतर त्यांना अठ्ठेचाळीस तासांच्या आत परत करावे लागतील. कार्यवाहीच्या दुरुस्त केलेल्या प्रती समितीच्या सदस्यांकडून परत मिळाल्या नाही तर प्रतिवेदकांची प्रत विश्वसनीय म्हणून समजण्यात येईल. साक्षीदारांकडे पाठविण्यात आलेले कार्यवाहीचे भाग त्यांच्याकडून न चुकता परत मिळविले पाहिजेत.

१४. अधिक माहिती आवश्यक असलेले मुद्दे.—समितीला ज्या मुद्यांबाबत अधिक माहिती आवश्यक असेल ते मुद्दे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय लिहून घेईल आणि समिती प्रमुखांच्या निदेशानुसार याबाबतीत आवश्यक ती कारवाई करील.

१५. साक्षीदारांना परत बोलावणे.—समितीच्या विचाराधीन असलेल्या कोणत्याही मुद्यांवर अधिक पुरावा सादर करण्याकरिता समिती कोणत्याही साक्षीदारास परत बोलावू शकेल.

१६. कागदपत्र सादर करणे.—(१) महाराष्ट्र विधानसभा नियमांनुसार समिती एखाद्या विषयाच्या तपासणीसंबंधात आवश्यक असलेल्या व्यक्तींना बोलावील आणि त्यासंबंधीचे कागदपत्र व अभिलेख मागवील. समितीला आवश्यक असलेले गुप्त कागदपत्र त्याचा गौप्यस्फोट राज्याच्या सुरक्षिततेच्या किंवा हिताच्या दृष्टीने हानिकारक असल्याच्या कारणावरुन उपलब्ध करणे शक्य नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र संबंधित मंत्र्यांनी दिले नसल्यास, असे कागदपत्र शासन/समाजकल्याण विभाग गुप्त रीतीने प्रथमतः समिती प्रमुखांना उपलब्ध करून देईल.

(२) समितीच्या सदस्यांना कोणताही गुप्त दस्तऐवज उपलब्ध करून देण्यापूर्वी समिती प्रमुख शासनाच्या समाजकल्याण विभागाच्या इच्छेचा योग्य तो विचार करतील. शासन/समाजकल्याण विभाग आणि समिती प्रमुख यांमधील कोणताही मतभेद चर्चा करून मिटविण्यात येईल व प्रकरणात कोणताही समाधानकारक समेट न झाल्यास ते प्रकरण अध्यक्षांसमोर त्यांच्या निर्णयासाठी ठेवण्यात येईल.

१७. शब्दशः कार्यवृत्त.–(१) शब्दशः कार्यवृत्त हे फक्त समितीच्या उपयोगासाठी राहील आणि सभागृहासमोर ठेवण्यात आलेले अशाप्रकारचे कागदपत्रच केवळ जनतेसाठी खुले राहतील.

(२) संबंध पुरावा किंवा त्याचा कोणताही भाग मुद्रित करण्याचे समिती ठरवील तेव्हा तो वेगळ्या खंडाच्या स्वरूपात मुद्रित करण्यात येईल आणि समिती हाताळीत असलेल्या विषयावरील अहवालाचा तो एक भाग होईल.

१८. बैठकीचे कार्यवृत्त.–समिती प्रमुखांच्या अनुमोदनासाठी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय समितीच्या/अभ्यासगटाच्या/उपसमितीच्या बैठकींच्या कार्यवृत्तांचे मसुदे तयार करील.

१९. अहवालासाठी मुद्दे.–मुद्यांचे परीक्षण पूर्ण झाल्यानंतर ताबडतोब चर्चा समाप्त झाल्याचे समिती प्रमुख जाहीर करतील आणि त्याची नोंद घेण्यास सांगतील. समिती, त्यानंतर या मुद्यांवर चर्चा करील आणि त्यावरील शिफारशी तयार करील.

२०. अहवालाचा मसुदा तयार करणे.–समितीने केलेल्या शिफारशींच्या अहवालाचा मसुदा सचिव तयार करतील आणि ते हा मसुदा समिती प्रमुखांना सादर करतील. समिती प्रमुखाने त्यास मान्यता दिल्यानंतर तो समितीच्या सदस्यांना परिसृत करण्यात येईल :

२१. भिन्न मतपत्रिका नसणे.–समितीच्या अहवालात भिन्न मतपत्रिका असणार नाही.

२२. अहवाल सादर करणे.–प्रत्येक अहवालाचा मसुदा किंवा त्याचा भाग समितीच्या बैठकीमध्ये विचारात घेण्यात येईल. त्यानंतर समितीप्रमुख समितीच्यावतीने त्यावर स्वाक्षरी करील व तो मुद्रित करण्यात येईल आणि सभागृहाला सादर करण्यात येईल.

२३. अहवालाचे वितरण.–सभागृहाला अहवाल सादर केल्यानंतर त्याच्या प्रती शक्य तितक्या लवकर विधानसभा/विधानपरिषद यांचे सदस्य आणि इतर संबंधित व्यक्ती व प्राधिकारी, इत्यादिंना उपलब्ध करून देण्यात येतील.

२४. समितीच्या बैठकींना समितीच्या सदस्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तींची उपस्थिती.–समितीचा सदस्य नसलेला विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य किंवा कोणतीही अन्य व्यक्ती, साक्षी घेण्याचे काम चालू असताना, समितीप्रमुखांच्या परवानगीने, समितीच्या

बैठकीस उपस्थित राहू शकेल. परंतु समिती विचारविमर्श करीत असताना ती व्यक्ती उपस्थित राहू शकणार नाही. तथापि, असा सदस्य कोणत्याही रीतीने समितीच्या कामकाजात भाग घेणार नाही किंवा समितीच्या सदस्यांच्या बैठकीत तो उपस्थित राहू शकणार नाही.

२५. कामकाजासंबंधीच्या मुद्यांचा नियमात अंतर्भाव करणे.—या नियमात वेळोवेळी घालण्यात आलेला कोणताही जादा मजकूर किंवा फेरबदल योग्य ते अनुमोदन मिळाल्यानंतर या नियमांत अंतर्भूत करण्यात येईल.

२६. साक्षीदारांनी अनुसरावयाचे वागणूक व शिष्टाचारविषयक नियम.—समिती किंवा उपसमितीसमोर उपस्थित राहणा-या साक्षीदारांनी खालील वागणूक व शिष्टाचारविषयक नियम पाळले पाहिजेत :—

(१) साक्षीदारांनी आपल्या जागेवर बसताना किंवा जागेवरून उठताना वाकून समितीप्रमुख व अभ्यास गट उप, समितीबद्दल योग्य तो आदर दाखविला पाहिजे ;

(२) साक्षीदाराने समितीप्रमुखासमोरच्या जागेवर बसले पाहिजे ;

(३) साक्षीदाराने त्यास समितीप्रमुखाने किवा समितीच्या एखाद्या सदस्याने/ समितीप्रमुखाने प्राधिकृत्त केलेल्या कोणत्याही इतर इसमास विचारलेल्या विशिष्ट प्रश्नास उत्तर दिले पाहिजे ;

(४) समितीप्रमुख व समितीसमोर मांडावयाचे सर्व मुद्दे सभ्य च विनयशील भाषेत स्पष्ट शब्दात मांडण्यात आले पाहिजेत;

(५) महाराष्ट्र विधानसभा नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, खालील कृत्यांमुळे समितीचा विशेष हक्कभंग व अवमान होईल याची साक्षीदाराने नोंद घ्यावी :—

(अ) विचारण्यात आलेली माहिती उघड न करणे, राज्याच्या सुरक्षिततेस किंवा हितसंबंधास अपायकारक ठरेल याकारणाखेरीज इतर कोणत्याही कारणावरून प्रश्नाचे उत्तर देण्यास नकार देणे ;

(ब) बनावट साक्ष तयार करणे किंवा जाणूनबुजून चुकीची साक्ष देणे किंवा सत्य लपविणे किंवा समितीची दिशाभूल करणे ;

(क) क्षुल्लक गोष्टींसाठी समितीचा वेळ घेणे किंवा अपमानकारक उत्तर देणे ;

(ड) चौकशी संबंधीत असा एखादा महत्वाचा दस्तऐवज नष्ट करणे किंवा त्याची नुकसानी करणे.

जोडपत्र

अनुसूचित जाती कल्याण समितीसंबंधी महाराष्ट्र विधानसभेने स्वीकृत केलेल्या प्रस्तावातील उतारा :—

(१) (अ) अनुक्रमे मा. अध्यक्ष व मा.सभापती यांनी नामनिर्देशित करावयाच्या विधानसभेतील अकरा व विधानपरिषदेतील चार अशा दोन्ही सभागृहातील पंधरा सदस्यांची अनुसूचित जाती कल्याण समिती या नावाची एक समिती घटीत करण्यात यावी.

(ब) कोणताही मंत्री या समितीचा सदस्य म्हणून नामनिर्देशनासाठी पात्र असणार नाही आणि एखादा सदस्य या समितीवर नामनिर्देशित करण्यात आल्यानंतर त्याची मंत्रीपदावर नियुक्ती झाल्यास नियुक्तीच्या तारखेपासून तो या समितीचा सदस्य राहणार नाही.

(क) मा. अध्यक्ष, समितीप्रमुख नामनिर्देशित करतील.

(२) समितीची कामे पुढीलप्रमाणे राहतील :—

(एक) अनुसूचित जाती व जमाती आयुक्तांनी संविधानातील अनुच्छेद ३३८(२) अन्वये सादर केलेल्या अहवालाचा महाराष्ट्र राज्यापुरता विचार करणे आणि राज्य शासनाच्या कक्षेत येणा-या बाबींसंबंधी राज्य शासनाने योजावयाच्या उपायांसंबंधीची माहिती दोन्ही सभागृहांना देणे.

(दोन) समितीने सुचविलेल्या उपायांवर शासनाने केलेल्या कारवाईसंबंधांची माहिती दोन्ही सभागृहांना देणे.

(तीन) संविधानातील अनुच्छेद ३३५ मधील तरतुदी लक्षात घेऊन राज्य शासनाच्या सेवेत व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या पदांवर (सरकारी प्रक्षेत्रातील उपक्रम तसेच वैधानिक व निमसरकारी संस्थांसह) अनुसूचित जातीच्या उमेदवारांना योग्य ते प्रतिनिधीत्व देण्याकरिता राज्य शासनाने योजलेल्या उपायांची तपासणी करणे.

(चार) राज्य शासनाच्या कक्षेत येणा-या अनुसूचित जातीच्या कल्याणासंबंधीच्या सर्व बाबींवर सर्वसामान्यपणे विचार करून त्या संबंधीचा अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करणे.

(पाच) सभागृहाने किंवा मा.अध्यक्षांनी तिच्याकडे विशेष करून सोपविलेल्या प्रकरणांची चौकशी करणे.

(३) समितीच्या सदस्यांचा पदावधी एक वर्ष इतका राहील.

(४) इतर सर्व बाबींत मा. अध्यक्ष ज्याप्रमाणे फेरबदल व फेरफार करतील तद्नुसार विधानमंडळ समितीला लागू असलेले या विधानसभेच्या कार्यपद्धतीचे नियम या समितीला लागू होतील.

परिशिष्ट "अ"

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या कल्याणासाठी उभय सभागृहातील सदस्यांची संयुक्त समिती नेमण्याबद्दल विधान कार्य मंत्र्यांचा प्रस्ताव

(दिनांक ३० एप्रिल १९७१ रोजी विधानसभेने संमत केलेला प्रस्ताव)

श्री. शं. भा. चव्हाण (विधान कार्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने खाली प्रस्ताव मांडतो :—

(१) (अ) एकलसंक्रमणीय मतदानाने आणि प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनुसार निवडून द्यावयाच्या विधानसभेतील ११ व विधानपरिषदेतील ४ अशा दोन्ही सभागृहातील १५ सदस्यांची "अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कल्याण समिती" या नावाची एक समिती घटित करण्यात यावी आणि हे मतदान गुप्त मतदान पद्धतीनुसार घ्यावे,

(ब) कोणताही मंत्री या समितीचा सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यास पात्र असणार नाही आणि एखादा सदस्य या समितीवर निवडून आल्यानंतर त्याची मंत्रीपदावर नियुक्ती झाल्यास, त्या नियुक्तीच्या तारखेपासून तो या समितीचा सदस्य राहणार नाही;

(क) समिती आपल्या सदस्यांमधून समिती प्रमुखाची निवड करील.

(२) समितीची कामे पुढीलप्रमाणे राहतील :—

(एक) अनुसूचित जाती व अनसूचित जमाती आयुक्तांनी संविधानातील अनुच्छेद ३३८(२) अन्वये सादर केलेल्या अहवालांचा महाराष्ट्र राज्यापुरता विचार करणे आणि राज्य सरकारच्या कक्षेत येणा-या बाबीसंबंधी राज्य सरकारने योजावयाच्या उपायांसबंधीची माहिती दोन्ही सभागृहांना देणे.

(दोन) समितीने सुचविलेल्या उपायांवर सरकारने केलेल्या कारवाईसंबंधीची माहिती दोन्ही सभागृहांना देणे.

(तीन) संविधानातील अनुच्छेद ३३५ मधील तरतुदी लक्षात घेऊन राज्य सरकारच्या सेवेत व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या पदावर (सरकारी प्रक्षेत्रातील उपक्रम तसेच वैधानिक व निमसरकारी संस्थांसह) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना योग्य ते प्रतिनिधित्व देण्याकरिता राज्य सरकारने योजलेल्या उपायांची तपासणी करणे.

(चार) राज्य सरकारच्या कक्षेत येणा-या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या कल्याणासंबंधीच्या सर्व बाबींवर सर्वसामान्यपणे विचार करून त्यासंबंधीचा अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करणे.

(पाच) सभागृहाला किंवा अध्यक्षांना विशेष करून निर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रकरणाची चौकशी करणे.

(३) समितीच्या सदस्यांचा पदावधी एक वर्ष किंवा विधानसभा बरखास्त होईपर्यंतचा कालावधी, यापैकी प्रथमतः जो कोणता कालावधी कमी असेल तोपर्यंत राहील व त्यानंतर तिच्या पुनर्घटनेच्या तारखेपासून दोन वर्षांपर्यंत राहील.

(३) इतर सर्व बाबतीत अध्यक्ष ज्याप्रमाणे फेरबदल व फेरफार करतील तद्नुसार विधानमंडळ समितीला लागू असलेले या विधानसभेच्या कार्यपद्धतीचे नियम या समितीला लागू होतील ; आणि

(४) हे सभागृह विधानपरिषदेला या समितीत सहभागी होण्याची आणि वर उल्लेखिल्याप्रमाणे विधानपरिषदेतून या समितीवर निवडून दिलेल्या सदस्यांची नावे या सभागृहाला कळविण्याची शिफारस करीत आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या कल्याणासाठी उभय सभागृहातील सदस्यांची संयुक्त समिती नेमण्याबद्दल मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव

(दिनांक ४ मे १९७१ रोजी विधानपरिषदेने संमत केलेला प्रस्ताव)

श्री. व्ही. पी. नाईक (मुख्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खाली प्रस्ताव मांडतो :—

(१) (अ) एकलसंक्रमणीय मतदानाने आणि प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनुसार निवडून द्यावयाच्या विधानसभेतील ११ व विधानपरिषदेतील ४ अशा दोन्ही सभागृहांतील १५ सदस्यांची, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कल्याण समिती या नावाची एक समिती घटित करण्यात यावी आणि हे मतदान गुप्त मतदान पद्धतीनुसार घ्यावे,

(ब) कोणताही मंत्री या समितीचा सदस्य म्हणून निवडणूक लढविण्यास पात्र असणार नाही आणि एखादा सदस्य या समितीवर निवडून आल्यानंतर, त्याची मंत्रिपदावर नियुक्ती झाल्यास त्या नियुक्तीच्या तारखेपासून तो या समितीचा सदस्य राहणार नाही,

(क) समिती आपल्या सदस्यांमधून समिती प्रमुखाची निवड करील.

(२) समितीची कामे पुढीलप्रमाणे राहतील :—

(एक) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयुक्तांनी संविधानातील अनुच्छेद ३३८ (२) अन्वये सादर केलेल्या अहवालांचा महाराष्ट्र राज्यापुरता विचार करणे आणि राज्य सरकारच्या कक्षेत येणा-या बाबीसंबंधी राज्य सरकारने योजावयाच्या उपायासंबंधीची माहिती दोन्ही सभागृहांना देणे.

(दोन) समितीने सुचविलेल्या उपायांवर सरकारने केलेल्या कारवाईसंबंधीची माहिती दोन्ही सभागृहांना देणे.

(तीन) संविधानातील अनुच्छेद ३३५ मधील तरतुदी लक्षात घेऊन राज्य सरकारच्या सेवेत व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या पदांवर (सरकारी प्रक्षेत्रातील उपक्रम तसेच वैधानिक व निमसरकारी संस्थांसह) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना योग्य ते प्रतिनिधित्व देण्याकरिता राज्य सरकारने योजलेल्या उपायांची तपासणी करणे.

(चार) राज्य सरकारच्या कक्षेत येणा-या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या कल्याणासंबंधीच्या सर्व बाबींवर सर्वसामान्यपणे विचार करून त्यासंबंधीचा अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करणे.

(पाच) सभागृहाला किंवा अध्यक्षांना विशेषकरून निर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रकरणांची चौकशी करणे.

(३) समितीच्या सदस्यांचा पदावधी एक वर्ष किंवा विधानसभा बरखास्त होईपर्यंतचा कालावधी, यापैकी प्रथमतः जो कोणता कालावधी कमी असेल तोपर्यंत राहील व त्यानंतर तिच्या पुनर्घटनेच्या तारखेपासून दोन वर्षांपर्यंत राहील.

(४) इतर सर्व बाबतीत अध्यक्ष ज्याप्रमाणे फेरबदल व फेरफार करतील तद्नुसार विधानमंडळ समितीला लागू असलेले या विधानसभेच्या कार्यपद्धतीचे नियम या समितीला लागू होतील ; आणि

(५) हे सभागृह असा ठराव करीत आहे की, यथावकाश या सभागृहाच्या चार सदस्यांची निवडणूक घेऊन उपरोल्लिखित समितीमध्ये सहभागी व्हावे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई